**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८.**

**मा.क प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक- १०**

**स भा वृ त्तां त**

**दिनांक ७-१२-२०१६** **वेळ-दुपारी ३.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "क" प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.७/१२/२०१६ रोजी **दुपारी ३.००** वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा.शितोळे शैलजा बाबुराव** **सभापती**
२) मा.सावळे सिमा रविंद्र
३) मा.भोसले राहूल हनुमंतराव
४) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
५) मा.कदम सदगुरु महादेव
६) मा.गिता सुशिल मंचरकर
७) मा.कैलास महादेव कदम
८) मा.जगताप नवनाथ दत्तू
९) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०) मा.प्रशांत शितोळे
११) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१२) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१३) मा.शेंडगे आशा सुखदेव
१४) मा.सतिश सदाशिव काटे स्विकृत सदस्य
१५) मा.हमीद नवाब शेख स्विकृत सदस्य

याशिवाय मा.अण्णा बोदडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.संजय घुबे -कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.शशिकांत दवंडे- उपअभियंता पापु, मा.विशाल कांबळे- उपअभियंता स्था.,मा.शिंदे- उपअभियंता, मा.वायकर- उपअभियंता, मा.सोनवणे-उपअभियंता विदयुत, श्री.शेख- कनिष्ठ अभियंता पापु, मा.जावळे- उपअभियंता पापु,श्री.देवकर- उपअभियंता झोनिपू, श्री.भंडारी- कनिष्ठ अभियंता स्थापत्य, मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, मा.उगले- लेखाधिकारी, श्री.रमेश भोसले, श्री.बेद - मुख्य आरोग्य निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालीलप्रमाणे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- २) विषय क्रमांक १ परत घेणेबाबत-मा.सिमा सावळे,मा.आशा शेंडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) रस्ता नामकरण करणेबाबत-मा.नवनाथ जगताप,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) पीडब्ल्यूडी वसाहतीजवळील चौकास नामकरण करणेबाबत- मा.नवनाथ जगताप,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ५) चौकाचे व रस्त्याचे नामकरण करणेबाबत- मा.नवनाथ जगताप, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ६) नामकरण करणेबाबत-मा.रमा ओव्हाळ व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ७) नामकरण करणेबाबत-मा.रमा ओव्हाळ व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ८) नामकरण करणेबाबत-मा.रमा ओव्हाळ व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ९) विठ्ठलमंदीर एच ए कॉलनी येथे येणा-या पंढरपुर पालखी व भाविक यांच्यासाठी शौचालय बांधण्यबाबत-मा.अमिना पानसरे व मा.कैलास कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-१०) मौजे दापोडी येथील वॉर्ड क्र. ६१ मधील रस्ता रुंदीबाबत- मा.नवनाथ जगताप,मा.हमीद शेख यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-११) प्रभाग क्र.४१ गांधीनगर मधील नव्याने बांधण्यात येणा-या उदयानाला खाली मान्यवरांची नांवे देणेबाबत- मा.सदगुरु कदम व मा.कैलास कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-१२) पवना नदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी तरतुद वर्ग करणेबाबत- मा.रोहितअप्पा काटे,मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-१३) प्र.क्र.३९ संत तुकारामनगर येथील महेशनगर चौकात शिल्प बसविणेबाबत- मा. सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे, मा.गिता मंचरकर

विषय क्रमांक-१४) रस्त्याचे नामकरण करणेबाबत- मा. सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-१५)प्रभाग क्र. ३७ महात्मा फुलेनगर येथील महात्मा फुलेनगर झोपडपट्टी येथील जुने दोन सिटचे जुनी मुतारी पाडणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक- २०३ विषय क्रमांक -१

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग- कक्षे आरोग्य

सुचक-मा.सिमा सावळे अनुमोदक-मा.आशा शेंडगे

संदर्भ- मा.क्षेत्रिय अधिकारी क क्षेत्रिय कार्यालय यांचे जा.क्र. कक्षे/आ १५ब/कावि/ङत्र्//२०१६ दिनांक १/१२/२०१६

विषय- स्वच्छ भारत मिशन (नागरी) व स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) अंतर्गत प्रभाग क्र.३८,४०,६०,६२ व ६३ या प्रभागामध्ये नागरिक उघडयावर शौचास जात असल्याचे दिसून येत नाही.यास्तव प्रभाग क्र.३८,४०, ६०,६२ व ६३ प्रभाग हगणदारीमुक्त जाहिर करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक -१ मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी सभा कामकाजामधुन परत घेण्याची विनंती केली असलेने विषय क्रमांक १ सभा कामकाजामधुन परत घेणेस मान्यता देणेत येत आहे.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २०४ विषय क्रमांक -२

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.सिमा सावळे अनुमोदक-मा.आशा शेंडगे

संदर्भ- मा.सिमा सावळे,मा.आशा शेंडगे यांचा प्रस्ताव.

क क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत असलेले सर्व प्रभाग हे ३१ मार्च २०१७ पर्यंत हगणदारीमुक्त जाहिर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २०५ विषय क्रमांक -३

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.नवनाथ जगताप अनुमोदक-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ- मा. नवनाथ जगताप,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.५८ नवी सांगवी मधील फेमस चौक ते क्रांती चौक जोडणारा रस्ता आहे.सदर रस्त्यावर श्री.महालक्ष्मी मंदीर आहे.तरी या रस्त्याला **"महालक्ष्मी मंदीर रस्ता"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २०६ विषय क्रमांक -४

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.नवनाथ जगताप अनुमोदक-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ- मा. नवनाथ जगताप,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.५८ नवी सांगवी मधील पी.डब्ल्यू.डी.वसाहतीजवळ पाण्याची टाकी तसेच जुनी सांगवी पोलीस चौकी समोर चौक आहे त्या चौकास नागरिकांच्या मागणीनुसार **"डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २०७ विषय क्रमांक - ५

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.नवनाथ जगताप अनुमोदक-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ- मा. नवनाथ जगताप,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.५८ नवी सांगवी मधील फेमस चौक ते शनि मंदीर या रस्त्यांस **"शनि मंदीर रस्ता"** असे नामकरण करण्यात यावे तसेच याच रस्त्यावरील बुलढाणा अर्बन को ऑप बँक समोरील चौकास **"आदर्शनगर चौक"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २०८ विषय क्रमांक - ६

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.रमा ओव्हाळ अनुमोदक-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ- मा. रमा ओव्हाळ,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंजुर विकास आराखडयानुसार मौजे दापोडी येथे स.नं.८५ (अ) मध्ये आरक्षण क्र. ३/२७,अग्निशामक दलासाठी (फायर स्टेशन) राखीव आहे. सदरची जागा ताब्यात घेऊन होणा-या इमारतीस **"छत्रपती शिवाजी महाराज अग्निशामक केंद्र"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २०९ विषय क्रमांक -७

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.रमा ओव्हाळ अनुमोदक-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ- मा. रमा ओव्हाळ,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंजुर विकास आराखडयानुसार मौजे दापोडी येथे स.नं.८५ (अ) मध्ये आरक्षण क्र. ३/२८,किरकोळ बाजारासाठी (रिटेल मार्केट) राखीव आहे. सदरची जागा ताब्यात घेऊन होणा-या इमारतीस / प्रवेशद्वारास **"डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिटेल मार्केट"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २१० विषय क्रमांक -८

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.रमा ओव्हाळ अनुमोदक-मा.सुषमा तनपुरे

संदर्भ- मा. रमा ओव्हाळ,मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंजुर विकास आराखडयानुसार मौजे दापोडी येथे स.नं.८५ (ब) मध्ये आरक्षण क्र. ३/३१, उदयानासाठी राखीव आहे. सदरची जागा ताब्यात घेऊन होणा-या उदयानास **"तथागत भगवान गौतम बुध्द उदयान"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २११ विषय क्रमांक -९
दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-
सुचक- मा.अमिना पानसरे अनुमोदक-मा.कैलास कदम
संदर्भ- मा. अमिना पानसरे ,मा. कैलास कदम यांचा प्रस्ताव.

विठ्ठल मंदीर एच.ए.कॉलनी येथे गेली अनेक वर्षापासून महाराष्ट्राची सर्वात मोठी संत तुकाराम महाराजांची पालखी पंढरपुरसाठी विठ्ठल मंदीरामध्ये विसाव्याला थांबत असते व त्यामुळे येथे मोठया संख्येने भाविक येत असतात त्याचप्रमाणे या मंदिरात नेहमीच विविध वर्दळ असते व मोठया संख्येने भाविक येत असतात त्या लोकांच्या सोईसाठी येथे शौचालयाची अत्यंत आवश्यकता आहे. तरी स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत सदर ठिकाणी शौचालय बांधुन देणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २१२ विषय क्रमांक -१०
दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-
सुचक- मा.नवनाथ जगताप अनुमोदक-मा.कैलास कदम
संदर्भ- मा. नवनाथ जगताप,मा. हमीद शेख यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे दापोडी येथील वॉर्ड क्र ६१ (हुतात्मा भगतसिंग विदयामंदीर) दापोडी मधील श्री.शिवाजी पुतळया समोरील मुख्य रस्ता मंजुर विकास आराखडयानुसार १२ मीटर रुंद आहे. सदर रस्ता पवना नदीचे बाजुला असणा-या पीडब्ल्यूडी वर्कशॉप व एस.टी.वर्कशॉपचे हद्दीपर्यंतच मर्यादित आहे. व मौजे सांगवीकडे जाणेसाठीचा रस्ता चालू आहे.या रस्त्याची आज रोजी असणारी रुंदी योग्य असून वाहतूक रहदारी मर्यादीत असल्याने व परिसर पवना नदीकडे संपुष्टात येत असल्याने म.रा.न.वि.अ.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही होऊन १ ९ मीटर रुंदीचा करणेत यावा व त्याप्रमाणे प्रस्ताव मान्य व्हावा तसेच प्रस्तावित सुधारित आराखडयामध्ये देखील बदल प्रशासनाने ग्राहय मानावा म्हणुन मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २१३ विषय क्रमांक -११
दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-
सुचक- मा.सदगुरु कदम अनुमोदक-मा.कैलास कदम
संदर्भ- मा. सदगुरु कदम,मा.कैलास कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ४१ गांधीनगर मधील नव्याने बांधण्यात येणा-या उदयानास खाली नमूद केलेल्या मान्यवरांची नांवे देणेत यावी.

**१)** कोहिनूर व्हायोना को.ऑप हौसिंग सोसायटी,पिंपरी येथील नव्याने बांधण्यात येणाऱ्या उदयानास **"कायदे पंडित अड राजाभाऊ सुर्यवंशी उदयान"**

**२)** गांधीनगर पिंपरी येथील नव्याने बांधण्यात येणाऱ्या उदयानास **"कै.महादेव गोविंद कदम उदयान"** याप्रमाणे नांवे देण्यात यावीत. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २१४ विषय क्रमांक -१२
दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-
सुचक- मा.रोहितअप्पा काटे अनुमोदक-मा.नवनाथ जगताप
संदर्भ- मा. रोहितअप्पा काटे ,मा. नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत सांगवी दापोडी येथील पवना नदीपात्रातील जलपर्णी / हायसिंथ काढणेकामी ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे या लेखाशिर्षामध्ये तरतुद कमी पडत असलेने खाजगीकरणाद्वारे साफसफाई करणे या लेखाशिर्षामधुन रक्कम रु. २०००००/- इतकी तरतुद ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे या लेखाशिर्षावर

वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २१५ विषय क्रमांक -१३

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.अमिना पानसरे अनुमोदक-मा.गिता मंचरकर

संदर्भ- मा. सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

प्र.क्र. ३९ संत तुकारामनगर येथील महेशनगर चौक वाहतुकीच्या दृष्टीने नव्याने विकसित करण्यात आला आहे.तरी सदर चौकात सदर ठिकाणी नव्याने शिल्प बसविण्यास परवानगी / मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- २१६ विषय क्रमांक -१४

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.अमिना पानसरे अनुमोदक-मा.गिता मंचरकर

संदर्भ- मा. सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

प्र.क्र. ३९ संत तुकारामनगर येथील वल्लभनगर परिसरातील सुजाता फ्लोअर मील ते पं.दिनदयाळ शाळेपर्यंच्या रस्त्याचे **"कै.संदिप वसंत शेवडे पथ"** असे नामकरण करणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- २१७ विषय क्रमांक -१५

दिनांक- ७/१२/२०१६ विभाग-

सुचक- मा.राहूल भोसले अनुमोदक-मा.अमिना पानसरे

संदर्भ- मा. जितेंद्र ननावरे, मा.राहूल भोसले, यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर येथील महात्मा फुलेनगर झोपडपट्टी येथील रस्त्याच्या कडेस जुनी दोन सिट्ची मुतारी आहे. सदर मुतारी जुनी असुन मुतारीचे बांधकाम ठिकठिकाणी पडलेले असलेने ती धोकादायक झालेली आहे.तरी सदरची मुतारी पाडणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-

(**मा.शितोळे शैलजा बाबुराव**)

सभापती- क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.

क्र-कक्षेका/कावि/१०५/२०१६.

दिनांक- १७/१२/२०१६

सही/-

प्रशासन अधिकारी

तथा सचिव सभाशाखा

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.